# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२३**

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

## उल्हासनगर महानगरपालिका (जि.ठाणे) अंतर्गत सर्व सोयी सुविधा घेणाऱ्या कर बुडव्यांची थकबाकी वसूल करण्याबाबत

**(१) ३८९५३ (२५-०४-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिका (जि.ठाणे) अंतर्गत सर्व सोयी सुविधा घेणाऱ्या ६५ हजार कर बुडव्यांनी २०० कोटीची थकबाकी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी थकबाकी वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, त्यानुषंगाने आतापर्यंत किती कराची रक्कम वसूल करण्यात आली आहे तसेच ज्यांनी सदर कराची थकबाकी भरलेली नाही, त्यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०३-२०२३) :** (१) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात माहे ऑगस्ट, २०२२ पर्यंत थकबाकीदारांची अंदाजित संख्या १,०१,३३४ इतकी असून, मालमत्ता करापोटी थकीत अंदाजित रक्कम रु. ४५९ कोटी इतकी आहे, असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) सदर थकबाकी वसूल करण्याकरिता उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व अधिनियमाचे अनुसूची "ड" चे प्रकरण ८ कराधान नियम यामधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे:-

६३३९९ इतक्या थकबाकीदारांविरुध्द मालमत्ता जप्ती/ अटकावणीचे अधिपत्र बजावण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली असून, ८९७५ थकबाकीदारांविरुध्द अधिपत्र बजावण्यात आले आहे.

७५ मालमत्ताधारकांची स्थावर मालमत्ता जप्ती/ अटकावणी करण्यात आली आहे.

मालमत्ता करावरील १००% विलंब शास्ती माफ करणेकामी दिनांक १७ मार्च, २०२२ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ या कालावधीत अभय योजना राबविण्यात आली असून, सदर अभय योजनेमध्ये अधिपत्र बजावलेल्या तसेच जप्ती अटकावणी केलेल्या मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला आहे.

सन २०२१-२२ या कालावधीत मालमत्ता कराची रु. १०९.८७ कोटी इतकी वसुली झाली आहे, असे उल्हासनगर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगाराचे सेवानिवृत्ती वेतन अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याबाबत

**(२) ४४७५५ (३०-१०-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणून सेवा केल्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या श्री.रमेश खंडागळे या निवृत्त कामगारावर उपाशीपोटी पदपथावर झोपण्याची वेळ आली असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवृत्तीनंतर मिळणारी आर्थिक देणी आणि निवृत्ती वेतन मागील ६ वर्षांपासून प्रलंबित राहिल्याने श्री.रमेश खंडागळे यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री.खंडागळे महापालिकेच्या एन (पश्चिम) कार्यालयाच्या सफाई खात्यातून माहे जानेवारी, २०१६ मध्ये सेवानिवृत्त झाले असून सेवानिवृत्तीनंतरच्या लाभांसाठी ते महानगरपालिका कार्यालयात वारंवार ये-जा करीत असून देखील त्यांना त्यांची देणी अदा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई महानगरपालिकेतील सेवानिवृत्ती सफाई कर्मचारी श्री.रमेश खंडागळे यांचे सेवानिवृत्तीनंतरची देणी तातडीने अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०३-२०२३) :** (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एच/पश्चिम विभागातील घन कचरा व्यवस्थापन खात्यातील श्री. रमेश रामचंद्र खंडागळे हे दिनांक ०१.०२.२०१६ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.

श्री. खंडागळे यांना माहे मे, २०२२ मध्ये भविष्य निर्वाह निधीचा दावा मंजूर झाला असून, सदर दाव्यापोटी रु. २,४८,३९० इतक्या रकमेचे त्यांना अधिदान करण्यात आले आहे. तसेच, निवृत्ती वेतन व ग्रॅज्युटीचे दावे मंजूर होऊन माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये रु. १८,२९,८७० इतक्या रकमेचे अधिदान झाले आहे.

अशाप्रकारे श्री. खंडागळे यांचे देय दावे निकाली काढण्यात येऊन त्यांचे अधिदान पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यासाठी वृक्ष व शेतीच्या कचऱ्यापासून तयार केलेल्या विटांसाठी निविदा राबविण्याबाबत

**(३) ४८४८५ (२८-०९-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेच्या स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यासाठी लाकडांऐवजी वृक्ष व शेतीच्या कचऱ्यापासून तयार केलेल्या विटा वापरण्याचा निर्णय सन २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी अद्याप पर्यंत झालेली नसून सद्य:स्थितीत महानगरपालिका या जैविक विटांसाठी निविदा प्रक्रिया राबविणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१७ मध्ये निर्णय घेवूनही निर्णयाची अंमलबजावणी करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(४) तसेच, जैविक विटांसाठी निविदा राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, बिलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०३-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) एका मृतदेह दहनासाठी कमीतकमी खर्च व्हावा तसेच झाडे वाचवा या प्रयोजनांतर्गत शवदहनासाठी लाकडाऐवजी ब्रिकेटसचा वापर करण्याबाबत प्रथमत: प्रायोगिक तत्वावर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ३ स्मशानभूमीमध्ये मृतदेहाचे दहन करण्यासाठी ब्रिकेटस या पर्यायी इंधनाचा वापर करण्यासाठी जाहिरातीद्वारे निविदा मागविण्यात आल्या.

सदर ई-निविदेमध्ये प्राप्त दरांबाबत निविदाकारांसोबत दिनांक ०५.०१.२०१७ रोजी झालेल्या बैठकीतील चर्चेअंती मृतदेह दहनासाठी जळाऊ लाकडांवर होणाऱ्या खर्चापेक्षा ब्रिकेटसवरील मृतदेह दहनासाठी होणारा खर्च तुलनात्मकदृष्ट्या अधिक आहे. त्यामुळे सद्य:स्थितीमध्ये ब्रिकेटसच्या प्राप्त झालेल्या दरांनुसार पुरवठा केल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेची बचत न होता जास्त खर्च होणार होता.

अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांनी दिलेल्या आदेशानुसार दिनांक ०५.०१.२०२२ रोजी प्राप्त होतील अशा पध्दतीने पुन:श्च ई-निविदा मागविण्यात आल्या. त्यानुसार सदर कंत्राटाला दिनांक ०२.०९.२०२२ रोजीच्या ठरावान्वये मंजुरी प्राप्त झाली असून, त्याअनुषंगाने कंत्राटदाराला हेतूपत्र देण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १४ स्मशानभूमीमध्ये लवकरच ब्रिकेटचा पुरवठा सुरु करण्यात येणार आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यात खाजगी वाहनांवर बेकायदेशीररित्या महाराष्ट्र शासन व पोलीस पाटी लावणाऱ्या वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करणेबाबत

**(४) ५०३२२ (२२-०१-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथे शासकीय अधिकारी खाजगी वाहनांवर "महाराष्ट्र शासन" व "पोलीस" अशा पाट्या व स्टिकर्सस सर्रासपणे नियम बाह्यरित्या लावून गाड्या चालवित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोटर वाहन कायद्याचे उल्लंघन करून खाजगी गाड्यांवर सर्रासपणे महाराष्ट्र शासन व पोलीस अशा पाट्या व स्टिकर्सस लावून वाहने चालविणाऱ्यावर पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालय व उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड मार्फत दंडात्मक कारवाई करण्यास हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी बेकायदेशीररित्या मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या खाजगी वाहन चालकांवर शासनाने कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०३-२०२३) :** (१) काही वाहनांवर असे प्रकार निदर्शनास आले आहेत.

(२) व (३) प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांनी व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या वायुवेग पथकांना अशा वाहनांवर कारवाई करण्याबाबत आदेश दिले आहेत.

वाहनांवर महाराष्ट्र शासन व पोलीस अशा पाट्या व स्टिकर्स लावलेल्या वाहनांवर पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

| कार्यालय | तपासलेली वाहने | दोषी वाहने | तडजोड शुल्क (रु.) |
|---|---|---|---|
| उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड | ८५ | ११ (तडजोड शुल्क भरणा केलेली प्रकरणे-९) | १०५००/- |
| पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पिंपरी-चिंचवड | १५ | १५ | ७५००/- |
| पोलीस उप आयुक्त गुन्हे,पुणे शहर | ६४ | ६४ | ३१५००/- |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अनुसूचित जाती व नवबौध्द यांच्या विकासासाठी अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत अर्थसंकल्पीय आर्थिक तरतुदीबाबत कायदा करण्याबाबत

**(५) ५०४१६ (१८-०१-२०२३). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती व नवबौध्द यांच्या विकासासाठी अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत सन २०१४-१५ ते २०१८-१९ या कालावधीतील सुमारे १४ हजार कोटींचा निधी सन २०१४-१५ ते सन २०१८-१९ या कालावधीत अखर्चित ठेवल्यामुळे सदरचा निधी व्यपगत झाल्यामुळे शासनास समर्पित करावा लागल्याचे दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतक्या मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित राहिल्यामुळे अथवा अन्य खात्यांच्या कामावर वळविल्यामुळे होणारे आरोप विचारात घेता, त्याबाबत "अर्थसंकल्पीय कायदा करण्यात येईल" असे तत्कालीन सामाजिक न्यायमंत्री यांनी सन २०२२ या कालावधीत जाहीर केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंध्रप्रदेश, तेलंगणा व कर्नाटक राज्यांच्या शासनाने अनुसुचित जाती जमातीचा निधी इतरत्र वळविण्यास तसेच अखर्चित निधी आगामी अर्थसंकल्पात वर्ग करुन त्याचा लाभ त्या समाजाला देण्याबाबतचा कायदा केला आहे, त्याच धर्तीवर शासनाने अर्थसंकल्पीय कायदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०३-२०२३) :** (१), (२) व (३) सन २०१४-१५ ते २०१८-१९ मध्ये अनुसूचित जाती उपयोजनेतंर्गत रु.३६४१९.५१ कोटी इतका निधी मंजूर झाला होता. त्यापैकी रु.२४९९१.४१ कोटी इतका निधी खर्च झालेला आहे. या विभागाकडून अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील वैयक्तिक लाभाच्या विविध योजना राबविण्यात येतात. तसेच इतर विभागांच्या वैयक्तिक लाभार्थ्यांच्या योजनेला अनुसूचित जाती व नवबौध्द लाभार्थ्यांसाठी अनुसूचित जाती घटक उपयोजनेतंर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. मात्र निधी खर्च करताना पात्र लाभार्थ्यांनाच दिला जाणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक विहित प्रक्रिया राबविताना निधी खर्च करण्यास मर्यादा येतात. सामाजिक न्याय विभागांतर्गत निधी अन्य खात्यांच्या कामांवर वळविण्यात येत नाही. आंध्रप्रदेश, कर्नाटक व ओरिसा या राज्याने सन २०१३ पासून अनुसूचित जाती उपयोजना व आदिवासी उपयोजनेचा कायदा केलेला आहे. सदरहू कायद्यांचा अभ्यास करुन महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसूचित जाती उपयोजना कायदा करण्यासाठीच्या प्रस्तावावर वित्त विभाग, नियोजन विभाग व विधी व न्याय विभागाच्या अभिप्रायानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेट्रो मार्ग -३ (ठाणे- भिवंडी कल्याण) या प्रलंबित प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत

**(६) ५१२१२ (२०-०१-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेट्रो मार्ग ३ (ठाणे- भिवंडी -कल्याण) या प्रकल्पाचे काम दोन टप्प्यात करण्यात येत असून ठाणे ते भिवंडी मधील स्थापत्य विषयक कामकाज ६३ % पूर्ण झाले असून उर्वरित काम पुनर्वसनाअभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गाच्या ३ किमीचा दुसरा टप्पाच्या (भिवंडी ते कल्याण) उन्नत मार्गिकेच्या भूमिकेत केलेल्या बदलास शासनाची मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भूमिगत कामाबाबत मे.दिल्ली मेट्रो रेल कार्पोरेशनकडून आलेल्या अहवालाची सक्षम प्राधिकरणामार्फत मंजुरी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने प्रलंबित असलेले प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०३-२०२३) :** (१), (२), (३) (४) व (५) ठाणे – भिवंडी – कल्याण मार्ग क्र. ३ नसून मेट्रो मार्ग – ५ आहे. या प्रकल्पातील टप्पा-१ ठाणे ते भिवंडी व टप्पा-२ भिवंडी ते कल्याण अशा दोन टप्प्यात करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. टप्पा-१ (ठाणे ते भिवंडी) मध्ये मार्गिकेसंबंधी तसेच पुनर्वसन व पुनर्वसाहत संबंधी विशेष समस्या नसल्यामुळे सदर लांबीतील स्थापत्य कामे हाती घेण्यात आली असून आतापर्यंत ७१ टक्के भौतिक प्रगती साध्य झाली आहे. तथापि टप्पा -२ (भिवंडी ते कल्याण) मेट्रो रेल मार्गिकेतील भिवंडी शहरातील राजीव गांधी चौक ते साईबाबा मंदीर, टेमघर पर्यंत (सुमारे ३ कि. मी. लांबी मध्ये) मोठया प्रमाणात पुनर्वसन व पुनर्वसाहत संबंधी समस्या असल्यामुळे टप्पा-२ ची स्थापत्य कामे अद्याप हाती घेण्यात आलेली नाहीत.

यास्तव मुंबई मेट्रो मार्ग-५ या प्रकल्पामध्ये धामणकर नाका ते टेमघर मधील -३ कि.मी. उन्नत मार्गिकेचा भूमिगत मार्गिकेत बदल करण्याचा प्रस्ताव प्राधिकरणामार्फत राज्य शासनास सादर करण्यात आला असून, सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## नागपूर येथील महामेट्रोची सेकंड फेज प्रलंबित असल्याबाबत

**(७) ५१४१७ (२२-०१-२०२३). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील महामेट्रोची सेंकड फेज सुरु करण्याची घोषणा केंद्रीय अर्थसंकल्पात माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १७ महिने उलटूनही सदरील काम अद्याप सुरु करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरील प्रकल्पाचे काम तातडीने सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२५-०३-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-२ प्रकल्पास राज्य शासनाने दिनांक १४.०१.२०१९ रोजी मान्यता दिली होती. त्यानुसार सदर प्रकल्पाचा प्रस्ताव दिनांक ११.०१.२०१९ केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. त्यास केंद्र शासनाने दिनांक २९.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे. केंद्र शासनाच्या मान्यतेनुसार सदर प्रकल्पास राज्य शासनाची सुधारीत मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तांदळवाडी (ता.रावेर, जि.जळगाव) येथील प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन भुखंडाचे वितरण करण्याबाबत

**(८) ५१५०३ (२७-०१-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तांदळवाडी (ता.रावेर, जि.जळगाव) येथील १०५ प्रकल्पग्रस्त कुटुंबे नवीन गावठाणात पुनर्वसन भुखंड मिळण्यासाठी सन २०१८ पासून प्रतिक्षेत असून अद्यापही भुखंड न मिळाल्यामुळे त्यांनी बेमुदत जलसमाधी आंदोलन सुरू केल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करून उक्त प्रकल्पग्रस्तांना त्वरित पुनर्वसन भुखंडचे वितरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२९-०३-२०२३) :** (१) होय, तांदळवाडी ता. रावेर येथील १०५ प्रकल्पग्रस्तांचे दि. ०१/११/२०२२ रोजी तांदळवाडी ता. रावेर येथे हतनूर प्रकल्प बॅकवॉटरच्या जलाशयामध्ये जलसमाधी आंदोलन करणेबाबत निवेदन जिल्हाधिकारी, जळगाव यांना दि. २१/१०/२०२२ रोजी प्राप्त झालेले आहे. जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या कार्यालयाचे दि.०१/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अध्यक्ष, पुनर्वसन संघर्ष समिती तांदळवाडी ता. रावेर यांना प्रकल्पग्रस्तांना प्रत्यक्ष भूखंड वाटपाची कार्यवाही दिनांक ३१/०३/२०२३ पावेतो पूर्ण करण्यात येईल असे कळविले आहे. त्यानुसार सदर आंदोलन मागे घेण्यात आलेले आहे.

(२) जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सहाय्यक संचालक, नगररचना जळगाव यांनी दिनांक १३/१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सुधारित अभिन्यास जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या कार्यालयास सादर केला आहे. त्यानुसार मौजे तांदळवाडी ता. रावेर येथील पुनर्वसन गावठाणात भूखंड वाटपाची प्रक्रीया दिनांक ३१/०३/२०२३ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा कार्यालय ठाणे येथे सुरू करण्याबाबत**

**(९) ५१९४० (१७-०१-२०२३). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथे मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा कार्यालय सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी प्रधान सचिव, अल्पसंख्याक विकास विभाग यांस दिनांक १४ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन सादर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पसंख्याक विकास विभागाने दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी जागेचा शोध घेण्यासाठी प्रभारी जिल्हा व्यवस्थापक, तसेच ठाणे व्यवस्थापकिय संचालक, तसेच मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, मर्या., मुंबई यांना निर्देश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुंषगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाने दिनांक २७.०७.२०२२ च्या पत्रान्वये प्रभारी जिल्हा व्यवस्थापक ठाणे यांना महामंडळाचे कार्यालय ठाणे येथे सुरु करण्यासाठी जागेचा शोध घेण्यासाठी कळविले आहे. त्याचप्रमाणे शासनाद्वारे सर्व जिल्हाधिकारी यांना महामंडळाच्या कार्यालयासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीमध्ये किंवा इतर शासकीय इमारतीमध्ये जागा उपलब्ध करुन देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील वीर व भाटघर प्रकल्पामुळे बाधित झालेल्या पुनर्वसित गावठाणामधील गावांना नागरी सुविधा उपलब्ध करण्याबाबत**

**(१०) ५२३७७ (२७-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील वीर व भाटघर प्रकल्पामुळे बाधित झालेल्या पुनर्वसित गावठाणामधील गावांना नागरी सुविधा उपलब्ध करण्यासाठी तेथील विकास कामांना प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे

काय,
(२) असल्यास, त्या अनुषंगाने उक्त विकास कामांना त्वरित मान्यता देऊन निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०३-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ नुसार देय नागरी सुविधा कामांची अंदाजपत्रके तयार करून उचित स्तरावरील तांत्रिक मान्यतेसह शासनास सादर करण्याबाबत शासन पत्र दि.२५.१०.२०२२ अन्वये विभागीय आयुक्त, पुणे यांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाली (ता.सुधागड, जि.रायगड) शहराकरीता मंजूर पाणीपुरवठा योजनेचे काम सुरु करण्याबाबत

**(११) ५२५३० (२२-०१-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाली (ता.सुधागड, जि.रायगड) शहराकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे अंदाजे १२.७५ कोटी रुपये किंमतीची पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू योजना अनेक वर्षापासून कागदोपत्री असल्याने व प्रत्यक्षात प्रगती न झाल्यामुळे सदर योजनेच्या कामास सुरूवात करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कामास झालेल्या वा होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पाली शहरात पाण्याच्या प्रतिक्षेत आलेल्या नागरीकांना लवकरात लवकर पाणीपुरवठा करण्यासाठी निधी मंजूर करून योजनेची सुरूवात करण्याबाबत शासनाने सत्वर कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०४-२०२३) :** (१) पाली ग्रामपंचायत अस्तित्वात असतांना सन २०१५-१६ मध्ये राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमातंर्गत रु.७.२५ कोटीची योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, माणगांव यांनी तयार केली होती. तथापि, तत्कालिन ग्रामपंचायतीकडून आवश्यक ठराव प्राप्त न झाल्यामुळे सदर योजना मंजूर झाली नसल्याचे नगरपंचायतीने कळविली आहे.
(२) यासंदर्भात मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निवेदन या विभागाकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(३) पाली नगरपंचायतीची स्थापना दि.३१/१२/२०२० रोजी झाली असून नवनिर्मित नगरपंचायतीने सुधारीत पाणीपुरवठा योजना तयार करण्यासाठी, ज्यामध्ये सर्वेक्षण करणे, पाणी टाकी क्षमता वाढविणे, जलशुध्दीकरण बांधणे, मुख्य पाणीपुरवठा पाईपलाईन, जलवितरण व्यवस्था व इतर अनुषंगिक कामे पूर्ण करण्याकरीता जाहिर निविदा मागवून सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Consultancy-PMC) ची नियुक्ती केली आहे. त्यानुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या तांत्रिक मान्यतेनंतर नगरोत्थान/अमृत २.० या योजनेतून प्रस्ताव सादर करणार असल्याचे नगरपंचायतीने कळविले आहे.
(४) सद्यस्थितीत नवनिर्मित पाली नगरपंचायतीच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही नगरपंचायत स्तरावर सुरु आहे. सुधारीत पाणी पुरवठा योजना भविष्यातील लोकसंख्येची वाढ गृहीत धरुन तयार करण्यात येत असल्याचे नगरपंचायतीने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अंबा (ता.सुधागड, जि.रायगड) नदीवरील पुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१२) ५२५३३ (१८-०१-२०२३). श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुधागड (जि. रायगड) येथे एम.एस.आर.डी.सी.व्दारे करण्यात येत असलेल्या वाकण ते खोपोली दरम्यान असलेल्या अंबा नदीवरील पुलाचे काम अद्याप पुर्ण न झाल्यामुळे अवजड व मोठया वाहनांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर कामास होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच काम लवकरात लवकर पुर्ण होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०२३) :** (१), (२) व ३) हे अंशत: खरे आहे.

सदर पुलाचा जोडरस्ता बनविण्यासाठी बाजूचे भूधारक, पूर्वीच्या भुसांपादनाचा मुद्दा उपस्थित करून कामात अडथळा आणत असल्यामुळे जोडरस्त्याच्या बांधकामास (Approach Road) विलंब झाला. याबाबत शासननिमोचित कार्यवाही करून सद्य:स्थितीत काम सुरु केले असून, जोड रस्त्यांची कामे प्रगतीत आहे.

पाली पुलाचे एका बाजूचे काम (२ lane) फेब्रुवारी २०२३ अखेर पूर्ण होईल व उर्वरीत दुसऱ्या बाजूचे काम मे २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

### नाशिक महानगरपालिकेत कर्मचाऱ्यांच्या सातव्या वेतन आयोगाचा फरक देयकात झालेल्या अनियमिततेची चौकशी होणेबाबत

**(१३) ५२५७७ (२२-०१-२०२३). श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेच्या अग्निशमन कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कत देतांना अनियमितता झाली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लेखा विभागाने या कर्मचाऱ्यांच्या नावाने सॉफ्टवेअरमधून दाखवलेला फरक आणि प्रत्यक्षात या कर्मचाऱ्यांनी काढलेला फरक यात लाखो रुपयांचा फरक असून ही रक्कम सुमारे चार कोटी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिकेच्या अग्निशमन दलाचे कर्मचारी जीव धोक्यात घालून काम करीत असतात मात्र त्यांच्या वेतन फरकातच अनिमितता झाल्याने या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२३) :** (१) नाही.

(२), (३) व (४) नाशिक महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना दि.०१/०१/२०१६ ते दि.३१/०३/२०२१ या कालावधीतील ७ व्या वेतन आयोग थकबाकीची रक्कम समान ५ हप्त्यात अदा करणेबाबत दि.२२/०७/२०२२ च्या आदेशान्वये महानगरपालिका प्रशासनामार्फत मंजुरी देण्यात आलेली आहे.

महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांचे वेतन देयके अदा करण्याचे काम सन २०१५ पासून ईआरपी या संगणकीय कार्यप्रणालीमधून सुरु झाले आहे.

अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांना जादा कामाचा मोबदला देण्याची सन २०१५ पासूनची देयके अदा करतांना ईआरपी कार्यप्रणालीमध्ये चुकीच्या संगणक कोड मध्ये नोंद झाल्याने, काही कर्मचाऱ्यांची ७ व्या वेतन आयोग फरकाची

रक्कम कमी परिगणित होत असल्याचे काही कर्मचाऱ्यांनी निदर्शनास आणल्यानंतर, सन २०१६ ते २०२१ पर्यंतचे संबंधित कर्मचाऱ्यांचे जादा कामाचे देयकांची माहिती संकलित करुन सदर माहिती ईआरपी कार्यप्रणालीमध्ये नव्याने नविन संगणक कोड मध्ये नोंद करण्यात आली.

सदरचे काम दिपावलीपर्यंत चालू असल्याने, उक्त कर्मचाऱ्यांना दिपावलीपूर्वी ७ व्या वेतन आयोगाचा फरक अदा करणे शक्य झाले नाही.

तसेच, माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये महानगरपालिकेतील इतर विभागांचे ७ व्या वेतन आयोगाचे फरकांची देयके व इतर देयके अदायगी करण्याचे काम ईआरपी प्रणालीतून चालू होते. त्यामुळे अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांचे ७ व्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम अदा करण्यास विलंब झालेला आहे.

तथापि, अग्निशमन विभागातील एकूण ३३ अधिकारी / कर्मचारी यांना दि.१५/१०/२०२२ रोजी व एकूण ९९ कर्मचाऱ्यांना दि.२५/११/२०२२ रोजी ७ व्या वेतन आयोगाचा फरकाचा पहिला हप्ता प्रदान करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी प्रशिक्षण संस्थेत "सहाय्यक वर्ग-३" या पदाची भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(१४) ५२७४४ (१८-०१-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, या विभागीय प्रशिक्षण संस्थेत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ११ मे, २०१५ नुसार प्रशासकीय "सहाय्यक वर्ग-३" या पदाची भरती प्रक्रिया राबविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भरती प्रक्रिया दिनांक ११ मे, २०१५ च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या विहित कार्यपध्दतीनुसार राबविली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाह्यस्त्रोत्राद्वारे परंतू वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच चाळणी परिक्षा व मुलाखती घेवुन भरती प्रक्रीया राबविली गेली नसल्याने निवडलेले उमेदवार कोणत्या निकषांवर निवडले याबाबत आणि नियमबाह्य उक्त भरती प्रक्रिया राबविणाऱ्या संबंधितांविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगाव मनपाचे तात्कालीन स्वीकृत विधी समिती सदस्य यांनी पोलीस चौकशीत हस्तक्षेप केल्याचा गंभीर प्रकरणाबाबत

**(१५) ५२८६१ (२२-०१-२०२३). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव महानगरपालिकेस जळगाव शहर पोलीस स्टेशन कडून पत्र क्र.४८१७/ २०१८, दिनांक १ सप्टेंबर, २०१९ रोजी पत्र देण्यात आले असून यामध्ये शेतकरी महिलेच्या मृत्युच्या पोलिसांकडील चौकशी प्रकरणात महानगरपालिका विधी समितीचे तत्कालीन स्वीकृत सदस्य श्री.धिरज रामचंद्र सोनी यांनी हस्तक्षेप केल्याचे सदर पत्रात नमूद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे श्री.धिरज सोनी यांनी मनपा आयुक्तांना अंधारात ठेऊन स्वतःचे लेटर हेड वर दिनांक १ जून, २०१८ रोजी खोटे पत्र दिले असून, उक्त प्रकरणी पोलीस अधिकाऱ्यांची समक्ष भेट घेतली आहे, हे ही

खरे आहे काय,
(३) असल्यास, श्री.धिरज सोनी यांना पोलिसांकडे पत्र देण्यासाठी मनपा आयुक्तांनी परवानगी दिली होती, व त्यानुसार श्री.धिरज सोनी यांनी पोलीस चौकशी स्थगित करण्याचे दिलेले पत्र अधिकाराचा गैरवापर केला असून, पोलिसांना दिलेल्या लेटर हेड पत्राची छपाई मनपाने केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी मनपाने श्री.धिरज सोनी यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे काय तसेच जळगाव शहर पोलीस स्टेशन कडील दिनांक १ सप्टेंबर, २०१८ रोजीच्या पत्रात मनपा आयुक्त यांनी चौकशी करून तक्रार द्यावी, असे नमूद केल्याप्रमाणे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०३-२०२३) :** (१) पोलीस विभागाकडून जळगाव महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या पत्रात असा आक्षेप नसून तक्रारदार यांच्या तक्रारीतील मजकूर नमूद केलेला आहे.

तत्कालिन विधी समितीने ठराव क्र.१६, दि.२४/०२/२०१८ अन्वये, तत्कालिन स्वीकृत सदस्य यांना फौजदारी किंवा इतर कुठल्याही प्रकारचे वाद चौकशी सुरु असल्यास संबंधित विभागाकडून योग्य ती माहिती घेणे, आवश्यकता असल्यास स्थगिती मागणे, असे महानगरपालिकेचे हित जोपासण्यासाठी करावयाच्या कृती बाबत निर्देश दिले होते.
(२) व (३) जळगाव महानगरपालिका विधी समितीचे तत्कालीन स्वीकृत सदस्य यांनी पोलीसांना दिलेल्या दि.०१/०६/२०१८ च्या पत्राची महानगरपालिका दप्तरी नोंद नाही. सदर पत्र (लेटरहेड) ची छपाई महानगरपालिकेने केलेली नाही.

महानगरपालिकेच्या सन्मा. सदस्यांना किंवा समिती सदस्यांना पत्रव्यवहार करतांना महानगरपालिका आयुक्तांची परवानगी घेणेबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात तरतूद नाही.
(४) महानगरपालिकेकडील भूसंपादन प्रस्ताव व इतर बाबींसंदर्भात पोलीस विभागाकडे प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने, महानगरपालिका अधिकारी व पदाधिकारी यांनी प्रचलित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही केलेली आहे व महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले नाही. त्यामुळे सदरहू प्रकरणात पोलीस विभागाकडे दाखल असलेल्या सर्व तक्रारी निकाली काढण्यात याव्यात, असे आयुक्त, जळगाव महानगरपालिका यांनी जिल्हा पोलीस अधिक्षक, जळगाव यांना दि.२६/१२/२०१९ अन्वये कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड - हैद्राबाद महामार्गावरील कृष्णूर एमआयडीसीलगत असलेला पाझर तलावाच्या पाळूच्या दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(१६) ५३०७८ (१८-०१-२०२३). श्री.माधवराव पवार (हदगाव), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड - हैद्राबाद महामार्गावरील कृष्णूर एमआयडीसीलागत असलेला पाझर तलावाच्या पाळूच्या (तलावाच्या कडा) दुरुस्तीचे काम शिवशंकर कंन्स्ट्रक्शन कंपनीला देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाझर तलावाच्या पाळूच्या दुरुस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे पुन्हा पाळूस विवर पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जलसंधारण विभागाचे अधिकारी व कंत्राटदाराने संगनमत करुन निकृष्टदर्जाचे काम केले असल्याने दोषींवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०२-२०२३) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

कृष्णूर पाझर तलावाची दुरुस्ती आजमितीस नांदेड जलसंधारण विभागामार्फत प्रगतीत आहे. यावर्षी नांदेड

जिल्ह्यातील नायगाव तालुक्यात तसेच तलाव क्षेत्रात दिनांक ५ ते ७ ऑगस्ट २०२२ दरम्यान ढगफुटी सदृश्य अतिवृष्टी झाली असून, अतिवृष्टीमुळे तलावाचे पाळू काही ठिकाणी अंशत: दबले असून भगदाड पडलेले नाही. तलाव फुटून बाजुच्या शेतीचे नुकसान होवू नये तसेच बंधाऱ्यात प्रकल्पीय क्षमतेने पाणीसाठा करण्यात यावा यासाठी दबलेल्या ठिकाणी मातीभराव करण्यात आलेला असून पाणी गळती थांबविण्यासाठी मुख्य भिंतीच्या वरील बाजूस जलरोधक खंदक घेवून व त्यात HDPE शिट वापरून काळ्या मातीने भरून ते बंद करण्यात आले आहे. आता पावसाळा संपल्यानंतर तसेच तलावातील पाणी पातळी कमी झाल्यानंतर तलाव दुरुस्तीचे उर्वरित काम हाती घेवून पुर्ण करण्यात येईल.
(३) तलाव दुरुस्तीचे काम अद्याप अपूर्ण असून कंत्राटदारास कामापोटी अद्याप देयकाची आदायगी करण्यात आलेली नाही. कामावर आजमितीस झालेला खर्च निरंक आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील जोगेश्वरी येथील महात्मा ज्योतिबा फुले मागासवर्गीय शासकीय वसतिगृहाची झालेली दूरवस्था

**(१७) ५३१७८ (२६-१२-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील जोगेश्वरी येथील महात्मा ज्योतिबा फुले मागासवर्गीय शासकीय वसतिगृहाची दुरवस्था झाल्याने जिन्याचे स्लॅब आणि खिडक्यांचे भाग कोसळल्याने विद्यार्थ्यांच्या जीवास धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने विद्यार्थ्यांनी सदर वसतिगृह चेंबुर किंवा म्हाडा इमारतीमध्ये तातडीने स्थलांतर करण्याकरिता उपोषण केल्याचे माहे नोव्हेबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-१२-२०२२) :** (१) व (२) महात्मा फुले मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, जोगेश्वरी,मुंबई या वसतिगृहाच्या इमारतीच्या खिडकीवरील भाग कोसळल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सदर वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांनी माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये उपोषण केले होते.
(३) जोगेश्वरी,मुंबई येथील महात्मा फुले मागासवर्गीय मुलांच्या शासकीय वसतिगृहासाठी पर्यायी जागा मिळावी या दृष्टीकोनातून जोगेश्वरी परिसरातील शिवशाही पुर्नवसन प्रकल्पांतर्गत चांदीवाला कंपाऊंड येथील सदनिका तात्पुरत्या स्वरूपात भाडे तत्वावर मिळण्याबाबत गृहनिर्माण विभागास विनंती करण्यात आलेली असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### देवळे (ता.इगतपुरी जि.नाशिक) येथे समृध्दी महामार्ग प्रकल्पावर सुरक्षारक्षक पुरविणारे योग्य कंत्राटदार नेमण्याबाबत

**(१८) ५३२६९ (२४-०१-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवळे (ता.इगतपुरी जि.नाशिक) येथे समृध्दी महामार्ग प्रकल्पावरील सुरक्षारक्षक पुरविणारे कंत्राटदार "एस.आर.मल्टिसर्व्हिसेस" यांचे व्यवस्थापक श्री.अरविंद गायकवाड यांचे कंत्राट तात्काळ काढून योग्य कंत्राटदार नेमण्याबाबत व जीव्हीपीआर कंपनीला जबाबदारीची जाणीव करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २० ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे

खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२३) :** (१) असे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) प्रकल्पाचे ठेकेदार जी.व्ही.पी.आर. कंपनीकडे चौकशी केली असता जी.व्ही.पी.आर. कंपनीने दिनांक ०८.१२.२०२२ च्या पत्रादवारे "कंपनीच्या मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी व कॅम्पच्या सुरक्षेसाठी एस.आर.मल्टिसर्व्हिसेस यांची खाजगीरित्या नेमणुक केल्याचे" कळविले आहे. तसेच श्री. अरविंद गायकवाड यांचा नमुद सुरक्षा एजन्सीशी काही संबंध नसुन ते जी.व्ही.पी.आर. कंपनीत सिव्हील कंन्सलटंन्ट व अतिरिक्त सुरक्षा अधिकारी म्हणुन कार्यरत असल्याचे नमुद केले आहे. उपरोक्त बाब ही ईपीसी कंत्राटदाराची पुर्णत: खाजगी बाब असुन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचा थेट संबंध नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिन्नर नगरपरिषद (जि.नाशिक) हद्दीतील सुर्योदय संकुलाचे इमारतीस नगरपालिकेने शासनाच्या नियमाविरुद्ध बांधकामासाठी परवानगी दिल्याबाबत

**(१९) ५३३६४ (२२-०१-२०२३). ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिन्नर नगरपरिषद (जि.नाशिक) हद्दीतील सुर्योदय संकुलाचे इमारतीस नगरपालिकेने शासनाच्या नियमा विरुध्द बांधकामासाठी परवानगी दिली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीला बांधकाम परवानगी देतांना शासनाच्या नियमानुसार पार्किंगची व्यवस्था न करता बांधकाम करण्यास परवानगी देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व बांधकामास परवानगी व पूर्णत्वाचा दाखला देणाऱ्या मुख्याधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) सदर इमारतीस सन १९९६-९७ साली मुळ बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. सदर इमारत रहिवास आणि वाणिज्य अशी मिश्र स्वरुपाची असल्याने, तत्कालीन प्रचलित बांधकाम नियमावलीनुसार इमारतीच्या चारही बाजुला आवश्यक सामासिक अंतरापेक्षा जास्तीचे अंतर सोडण्यात आले आहे. सद्यस्थितीत पार्किंगकरीता जागा उपलब्ध आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिन्नर नगरपरिषद हद्दीतील (जि.नाशिक) शिवाजीनगर भागातील मोकळ्या जागेवर अधिकचे बांधकाम केल्याबाबत

**(२०) ५३३८२ (२०-०१-२०२३). ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्ह्यातील सिन्नर नगरपरिषद हद्दीतील शिवाजीनगर भागातील सर्वे नं.१०६५/ १ ते ५/१ + १०६५/१ ते ५/३+१०६५/१ ते ५/५ + १०७०/२ या सर्वे नंबरच्या मोकळ्या जागेवर १० टक्के बांधकामास परवानगी असताना मुख्याधिकारी, सिन्नर यांनी ५० टक्के बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू बांधकाम ५० टक्के करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू बांधकाम बेकायदेशीरपणे केले असल्यामुळे संबंधित मुख्याधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

सदर मंजूर अभिन्यासातील खुल्या जागेचे क्षेत्र ३५९० चौ.मी. इतके असून, एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील तरतूद ३.४.७ (i) नुसार सदर जागेवर जास्तीत जास्त १५% बांधकाम करणे अनुज्ञेय आहे. त्यापैकी १०% बांधकाम तळमजल्यावर अनुज्ञेय आहे. त्यानुसार मंजूर अभिन्यासातील खुल्या जागेवर १०% प्रमाणे तळमजल्याकरीता ३५९ चौ.मी. इतके बांधकाम अनुज्ञेय आहे.

अभिन्यासातील भुखंडधारकांना व शहरातील नागरिकांना सोयी सुविधा पुरविण्याकरीता नगरपरिषदेमार्फत मा.लोकसभा सदस्यांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत इमारतीचे बांधकाम करण्यात आले आहे. सदर बांधकाम ३२२.१५ चौ.मी. इतके असून अनुज्ञेय मर्यादेत आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील समाजकल्याण विभागाच्या निवासी शाळामध्ये कमर्चारीवृंदास सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(२१) ५३४४३ (१८-०१-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील समाजकल्याण विभागाच्या ८० निवासी शाळा असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समाजकल्याण विभागाच्या निवासी शाळेतील मुख्याध्यापक, ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहायक, अधिक्षक, गृहपाल व कनिष्ठ लिपीक, शिपाई यांना सन २०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुख्याध्यापक व शिक्षक कमर्चारीवृंदास सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०३-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

समाज कल्याण विभागांतर्गत सद्यस्थितीत ९० शासकीय निवासी शाळा सद्यस्थितीत सुरू आहेत.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

समाज कल्याण विभागाच्या निवासी शाळेतील अधिक्षक/गृहपाल व कनिष्ठ लिपीक, शिपाई यांना सन २०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाड शहरामध्ये ( जि.रायगड ) हेलिपॅड बांधण्याच्या प्रस्तावाबाबत

**(२२) ५३४८७ (१८-०१-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड शहरानजीक (जि.रायगड) मोहप्रे गावहद्दीत नैसर्गिक आपत्तीचा विचार करता हेलिपॅड बांधण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हेलीपॅड उभारणीच्या कामासाठी शासनाने किती निधीची तरतूद केली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) महाड मधील पूरपरिस्थितीचा विचार करता महाड शहरालगत हेलिपॅडची गरज आहे. शहरालगत शासकीय जागा उपलब्ध नाही. नैसर्गिक आपत्तीचा विचार करता हेलिपॅड बांधण्याच्या दृष्टिने मौजे महाड महसूली गावातील खाजगी जागेची सार्वजनिक बांधकाम विभाग व तहसील कार्यालय महाड यांनी संयुक्त पाहणी केली असून सदरची जागा हेलिपॅड बांधण्यासाठी योग्य असून (महाड शहरातील पूर रेषेच्या बाहेर असल्यामुळे) निश्चित करण्यात आली आहे असे जिल्हाधिकारी रायगड यांनी याबाबत कळविले आहे. जिल्हाधिकारी रायगड व सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या स्तरावर याबाबत पुढील कार्यवाही सुरू आहे.

---

**राज्यात दिव्यांगासाठी नविन स्वतंत्र विभाग स्थापित झाल्याबाबत**

**(२३) ५३५९५ (१८-०१-२०२३). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिव्यांगासाठी नविन स्वतंत्र विभाग स्थापन करण्याचा निर्णय माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्वतंत्र दिव्यांग विभागामध्ये कोणकोणत्या योजना समाविष्ट आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे आहे, स्वतंत्र दिव्यांग कल्याण विभाग करण्याचा निर्णय २९ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

(२) शासन अधिसूचनेन्वये दिव्यांग कल्याण विभागाकडे पुढील विषयांतर्गत योजना समाविष्ट आहेत.

१. भारतीय पुनर्वास परिषद अधिनियम,१९९२

२. ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी, मतिमंदता आणि एकाधिक अपंगत्वग्रस्त व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय न्यास अधिनियम, १९९९.

३. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम,२०१६

४. दिव्यांग व्यक्तींसाठीचे महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण, २०१८ याची परिणामकारक अमंलबजावणी करणे.

५. शालांत परीक्षापूर्व शिक्षणासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती .

६. शालांत परीक्षोत्तर (मॅट्रिकोत्तर) शिक्षणासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती.

७. दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल तसेच व्यवसायासाठी अर्थसहाय्य.

८. दिव्यांग विद्यार्थ्यांना गुणवत्ता पारितोषिके.

९. दिव्यांगांच्या क्रिडा स्पर्धा.

१०. दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे.

११. दिव्यांग कल्याण राज्य पुरस्कार.

१२. जागतिक दिव्यांग दिन साजरा करणे.

१३. दिव्यांग मार्गदर्शन व सल्ला केंद्रे.

१४. मतिमदांकरिता बालगृहे.

१५. दिव्यांग-अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजना.

१६. महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यात दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयव तपासणी शिबीरातील साहित्य वाटप करण्यात झालेली दिरंगाई

**(२४) ५३८९४ (१८-०१-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या माध्यमातून रत्नागिरी जिल्ह्यात दिव्यांगांसाठी कृत्रिम अवयव तपासणी शिबीर माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आयोजित करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिबीरात नोंदणी झाल्यानुसार सुमारे ६ कोटींपेक्षा जास्त किंमतीचे साहित्य मंजूर होवून प्रत्यक्ष वाटप करण्याकरिता उपलब्ध करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लाभार्थीच्या साहित्य वाटपाची यादी केंद्रीय प्रशासनाकडून वेळेवर उपलब्ध न झाल्याने साहित्य अर्धवट स्वरुपात पुरविण्यात आले तसेच सदर साहित्याच्या वाटपासाठी केंद्रीय मंत्र्यांची वेळ मिळाली नसल्याने लाभार्थ्यांना सदर साहित्य मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र व राज्य प्रशासन यामधील समतोल साधण्यासाठी व पूर्ण साहित्य लाभार्थ्यांना वेळेवर मिळवून देण्यासाठी प्रशासकीय पातळीवर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासानाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१६-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

तथापि केंद्र शासनाच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना सहाय्यक साधने व उपकरणे वाटप करणे (ADIP) योजनेअंतर्गत रत्नागिरी जिल्हयामध्ये भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (आल्मिको) या संस्थेमार्फत माहे डिसेंबर २०२१ अखेर व जानेवारी २०२२ चे सुरुवातीस तपासणी शिबिरे संपन्न झाली आहे. तसेच अलिम्को संस्थेकडुन माहे मे २०२२ अखेर व जून २०२२ चे सुरुवातीच्या आठवडयामध्ये तालूकानिहाय साहित्याचे वाटप शिबिर घेण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

तथापि रत्नागिरी जिल्हयातील तपासणी शिबिरातून पात्र लाभार्थ्यांना भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (आल्मिको) या संस्थेकडुन साहित्य वाटप करण्यात आले आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्हयातील केंद्र शासनाच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना सहाय्यक साधने व उपकरणे वाटप करणे (ADIP) योजने अंतर्गत तालुकानिहाय शिबिरामध्ये भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (आल्मिको) संस्थेने एकूण २३९९ इतके लाभार्थी पात्र केले होते. त्यापैकी २०४८ इतक्या लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे व ३५१ इतके लाभार्थी प्रतिक्षाधीन आहेत.

तसेच वयोश्री योजने अंतर्गत जेष्ठ नागरिक यांना अलिम्को संस्थेने एकूण २५३७ इतके लाभार्थी पात्र केले होते. त्यापैकी २१३३ इतक्या लाभार्थ्यांना लाभ दिलेला आहे व ४०४ इतके लाभार्थी प्रतिक्षाधीन आहेत.

सदर साहित्याच्या वाटपासाठी केंद्रीय मंत्र्यांची वेळ मिळाली नसल्याने सदर साहित्य मिळाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे नाही.

(४) जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडील दि.२५.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (आल्मिको) संस्थेला उर्वरित प्रतिक्षाधीन पात्र लाभार्थ्यांना साहित्याचे वाटप पावसाळयाच्या आधी करणेबाबत पत्र व्यवहार केलेला आहे. उर्वरित लाभार्थ्यांना साहित्य मिळण्याबाबत जिल्हा कार्यालयाकडून पाठपूरावा सुरु असल्याचे नमुद करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

## हिंगोली जिल्ह्यात दलित वस्ती सुधार योजनेतील कामे प्रलंबित असल्याबाबत

**(२५) ५३९४३ (१८-०१-२०२३). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात दलितवस्ती सुधार योजनेमध्ये मंजूर झालेल्या ३६८ कामांपैकी केवळ १५३ कामे पूर्ण झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उर्वरीत कामे पूर्ण करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०२-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे,

(२) सदर योजनेमध्ये मंजूर झालेल्या ३६८ कामांपैकी २६९ कामे पूर्ण असून ९९ कामे प्रगतिपथावर आहेत. सदर ९९ कामे विहित मुदतीत म्हणजेच माहे मार्च, २०२३ अखेरपर्यंत पूर्ण करण्याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात आलेले आहे,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सफाई कामगारांच्या वारसदारांना मदत देण्यासाठी कंत्राटदारावर व स्थानिक स्वराज्य संस्थांवर जबाबदारी निश्चित करण्याबाबत

**(२६) ५३९९४ (२२-०१-२०२३). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका व स्थानिक स्वराज्य संस्था यामध्ये काम करणाऱ्या सफाई कामगारांचा काम करीत असताना गुदमरून अथवा कामावर अपघातामुळे मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसदारांना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून दहा लाखाची मदत देण्याची तरतूद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कंत्राटदारामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सफाई कामगारांचा अशा परिस्थितीत मृत्यू झाल्यास कोणतीही मदत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडून किंवा कंत्राटदारांकडून दिली जात नाही, त्यामुळे सफाई कामगारांच्या वारसावर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटदारामार्फत पुरवण्यात येणाऱ्या सफाई कामगारांच्या वारसदारांना मदत देण्यासाठी कंत्राटदारावर व स्थानिक स्वराज्य संस्थांवर जबाबदारी निश्चित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०३-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नागरी स्थानिक स्वराज्य सस्थांमध्ये कार्यारत सफाई कामगारांना (नियमित / कंत्राटी ततवावर / रोजंदारी / बाह्यस्त्रोताद्वारे) तसेच नागरी स्थानिक स्वराज्य सस्थांनी नेमलेल्या खाजगी कंत्राटदाराकडील/बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटाद्वारे नागरी स्थानिक स्वराज्य सस्थेच्या कामासाठी नियुक्त सफाई कामगारांना देखिल नुकसान भरपाई देण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक १२/१२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये महानगरपालिकेकरीता आयुक्त व नगरपरिषद/ नगरपंचायतीकरीता मुख्याधिकारी यांना सक्षम प्राधिकारी म्हणून निश्चित केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यातील इतर मागासवर्ग समाजाचे आरक्षण पूर्ववत करणेबाबत

**(२७) ५४००६ (२४-०१-२०२३). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यामध्ये सन १९९४ या कालावधीपर्यंत इतर मागासवर्ग समाजाला १९% आरक्षण लागू होते ते सन १९९७ मध्ये कमी करून १९ % वरून ११ % वर आणण्यात आले तद्नंतर सन २००२ मध्ये ११ % वरून केवळ ६% वर आरक्षण देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी सन २०१८ पासून विविध संसदीय माध्यमातून प्रश्न उपस्थित करूनही इतर मागासवर्ग समाजाला अद्याप उचित न्याय मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाप्रती इतर मागासवर्ग समाजामध्ये असंतोष निर्माण होत असून इतर मागासवर्ग आरक्षण पूर्ववत करण्यासंदर्भात शासनाने कोणती ठोस भूमिका घेतली वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०३-२०२३) :** (१), (२) व (३) मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार इतर मागास वर्गास दि.१८.६.१९९४ च्या शासन निर्णयान्वये १९% आरक्षण विहित करण्यात आले. दि.१.९.१९९७ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीची लोकसंख्या जास्त असलेल्या गडचिरोली जिल्हयातील गट “क” व गट “ड” (वर्ग-३ व वर्ग-४) मध्ये अनुसूचित जमातीला १५% आरक्षण देण्यात आल्यामुळे इतर मागास वर्गास ११% आरक्षण विहित करण्यात आले. त्यानंतर दि.२५.१०.२००२ च्या शासन निर्णयान्वये गडचिरोली जिल्ह्यात अनुसूचित जमातीला १५% वरुन २४% इतके आरक्षण विहित करण्याचा निर्णय झाल्याने इतर मागास वर्गासाठी ६% आरक्षण विहित करण्यात आले. त्यानंतर दि.२३.९.२०२१ च्या शासन निर्णयान्वये गडचिरोली जिल्हयातील इतर मागास वर्गास १७% आरक्षण विहित करण्यात आले. त्यांनतर मंत्रीमंडळ उपसमितीने केलेल्या शिफारशीनुसार गडचिरोली जिल्ह्यातील जिल्हास्तरीय गट “क” व गट “ड” संवर्गातील पदांच्या सरळसेवा भरतीसाठी दि.३.१.२०२२ च्या शासन निर्णयान्वये इतर मागास वर्गास १७ % आरक्षण विहित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मावळ (जि.पुणे) तालुक्यातील पवित्र इंद्रायणी नदीमध्ये होणाऱ्या प्रदूषणाबाबत

**(२८) ५४१०६ (२६-१२-२०२२). श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबे वराळे (ता.मावळ, जि.पुणे) गावच्या हद्दीतील औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांचे धोकादायक रासायनिक पाणी व गावातील दूषित सांडपाणी इंद्रायणी नदी पात्रात सोडल्यामुळे तसेच नदीपात्रात विविध प्रकारचा कचरा वाढल्याने नदीला गटाराचे स्वरूप आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या नदीपात्राच्या मार्गातील ग्रामपंचायत, नगरपरिषद व औद्योगिक कारखान्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या जोडलेल्या जलवाहिनीच्या नदी पात्राजवळची स्थिती खूपच बिकट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नदीतील पाणी शुद्धीकरण केले तरी त्यातील रासायनिक घटक पाण्यातच राहत असल्यामुळे जनावरांसह मानवी आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी वारंवार पाठपुरावा करूनही समस्येचे कायमस्वरूपी निराकरण होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये शासनाविषयी नाराजी पसरलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सत्वर चौकशी करुन कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-१२-२०२२) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

आंबे वराळे (ता. मावळ, जि. पुणे) परिसरातील उद्योगांकडून कोणत्याही प्रकारचे सांडपाणी सोडले जात नाही. तथापि, इंद्रायणी नदीच्या काठावर वसलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विनाप्रक्रिया घरगुती सांडपाणी काही प्रमाणात इंद्रायणी नदीत मिसळले जाते.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निर्माण होणाऱ्या संपूर्ण सांडपाण्यावर प्रक्रिया होत नसल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना वेळोवेळी जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अन्वये कारणे दाखवा आदेश तसेच जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ च्या कलम ३३ (अ) अंतर्गत आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निर्माण होणाऱ्या घरगुती सांडपाण्यावर कायमस्वरुपी प्रक्रिया यंत्रणा उभारण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राळेगाव, कळंब, बाभुळगाव (जि.यवतमाळ) नगरपंचायतीमधील मुख्यधिकारी पद रिक्त असल्याबाबत**

**(२९) ५४२१६ (२२-०१-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव, कळंब, बाभुळगाव (जि.यवतमाळ) नगरपंचायतीमधील मुख्याधिकारी हे पद मागील चार महिन्यांपासून रिक्त असल्याने तीन नगरपंचायतींचा अतिरिक्त प्रभार एकाच अधिकाऱ्याकडे असल्याने शहरातील नागरीकांची विविध कामे होण्यास विलंब होत असल्याने नागरीकांनी शासनाकडे निवेदन दिल्याचे दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकाच अधिकाऱ्याकडे तीन नगरपंचायतीचा कार्यभार असल्याने अधिकारी लक्ष देवू शकत नसल्याने जन्म-मृत्यूचे दाखले, पाणी टंचाई, नागरी स्वच्छता, इत्यादी विकास कामे होण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार नागरिकांची कामे वेळेत पूर्ण होण्याकरिता उपरोक्त नगरपंचायत क्षेत्रातील रिक्त असलेले मुख्यधिकारी यांचे पद भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०२३) :** (१) अध्यक्ष, न.पं. राळेगांव यांनी दिनांक २७.१०.२०२२ च्या पत्रान्वये नगरपंचायत राळेगांव करीता पूर्ण वेळ मुख्याधिकारी मिळणेबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांना निवेदन सादर केले आहे.

(२) रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपवून कामकाज पार पाडण्यात येत आहे.

(३) मुख्याधिकारी संवर्गात पदोन्नतीने पदे भरण्याचे प्रस्तावित असून, पदोन्नतीने उपलब्ध होण्याऱ्या अधिकाऱ्यांमधून सदर रिक्त पद भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील सुतारवाडीजवळ महामार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३०) ५४२७९ (१८-०१-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळशी (जि.पुणे) तालुक्यातील सुतारवाडीजवळ चांदणी चौकातून कोकणाकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे काम गत १० महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे दिनांक २६ ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपघाती वळण असलेल्या या अर्धवट रस्त्यामुळे आतापर्यंत एकाचा मृत्यू झाला असून अनेकजण

जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने माहिती घेवून सदरील महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अशी कोणतीही बाब आढळून आली नाही.
(३) महामार्गाचे काम तातडीने पूर्ण होण्यासाठी ठेकेदारास वेळोवेळी बैठका घेऊन सूचना देण्यात येत आहेत. मार्च २०२३ अखेर राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३फ चे अर्धवट काम पूर्ण करण्याचे व मे २०२३ अखेर पूर्ण महामार्गाचे काम करण्याचे आश्वासन ठेकेदाराने दिलेले आहे.
(४) ठेकेदारास गौण खनिज वेळोवेळी उपलब्ध न झाल्याने विलंब झाल्याचे दिसून येते. सद्य:स्थितीत काम प्रगतीत आहे.

---

**वरुड (जि. अमरावती) तालुक्यातील महापुरामुळे बाधित झालेल्या पुनर्वसित गांवामधे मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत**

**(३१) ५४३०४ (२७-०१-२०२३). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरुड (जि. अमरावती) तालुक्यातील २८ गावे सन १९९१ मध्ये झालेल्या महापुरामुळे अंशत: व ३ गावे पुर्णतः बाधित झाली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यापैकी पुर्णतः बाधित मौजा पळसवाडा, भापकी व हातुर्णा येथील पुरग्रस्त लाभार्थ्यांना पुनर्वसन क्षेत्रात घर बांधणीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच अंशत: बाधित झालेल्या २८ गावांमध्ये नागरी सुविधा पुरविण्यासाठी विभागीय आयुक्त, अमरावती यांचेमार्फत दाखल केलेला प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुलभूत नागरी सुविधांचे अभावी प्रचंड गैरसोईना सामोरे जात असलेल्या उक्त ग्रामस्थांना विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडून पाठविण्यात आलेल्या प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०३-२०२३) :** (१) होय.
(२) व (३) मौजे पळसवाडा, भापकी व हातुर्णा या पूरग्रस्त लाभार्थ्यांना पुनर्वसन क्षेत्रात एकूण ३७० घरे प्रधानमंत्री आवास योजनेच्या धर्तीवर घरबांधणीसाठीच्या निधी देण्याकरीता ग्राम विकास विभागाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला असून त्यांच्या मान्यतेनंतर शासन मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येईल. तसेच २८ गावातील नागरी सुविधा कामांना दि.१७/०२/२०२३ व दि.२८/०२/२०२३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर व नांदुरा (जि. बुलढाणा) येथील स्वातंत्र सैनिक हुतात्मा स्मारकाचे दुरुस्ती व सुशोभीकरण करण्याकरीता निधी मिळण्याबाबत**

**(३२) ५४३२० (२४-०१-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजु पारवे (उमरेड), श्री.सहसराम कोरोटे (आमगाव), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर व नांदुरा (जि. बुलढाणा) येथील स्वातंत्र सैनिक हुतात्मा स्मारकाचे दुरुस्ती व सुशोभीकरण करण्याकरीता निधी मिळण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे,

हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर स्मारकाच्या दुरुस्ती व सुशोभीकरणासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०२-२०२३) :** (१) होय.
(२) राज्यातील सर्व २०६ हुतात्मा स्मारकांची दुरुस्ती व सुशोभिकरण करण्यासाठी शासनाने सन २०१६-२०१७ ते सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात विविध शासन निर्णयांन्वये, शासन निर्णयांमध्ये नमूद केलेल्या कामांची दुरुस्ती/सुशोभिकरण करण्यासाठीएकूण रु.४२.०२ कोटी इतका निधी सर्व जिल्हाधिकारी यांना वितरीत केला आहे.
त्यापैकी बुलढाणा जिल्ह्यातील एकूण ३ हुतात्मा स्मारकांकरिता प्रति स्मारक रु.१८.९५ लक्ष याप्रमाणे एकूण रु.५६.८६ लक्ष इतके अनुदान वितरीत करण्यात आले आहे.
याव्यतिरिक्त हुतात्मा स्मारकांचे परिरक्षण व निगा याकरिता दरवर्षी प्रति हुतात्मा स्मारक रु.१०,०००/- याप्रमाणे निधी सर्व जिल्हाधिकारी यांना वितरीत करण्यात येतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दौंड तालुक्यातील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील समाविष्ट गावाच्या ग्रामीण रस्त्याच्या विकासासाठी निधी मिळणेबाबत

**(३३) ५४३३६ (२०-०१-२०२३). ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड तालुक्यातील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील समाविष्ट ५१ गावाच्या ग्रामीण रस्त्याच्या विकासासाठी निधी मिळणेबाबतची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ नोव्हेबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या कामासाठी निधी मिळणेबाबत मा.पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त यांनी प्रस्ताव सादर करावेत असे निर्देश मा.मुख्यमंत्री यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१३-०३-२०२३) :** (१) व (२) होय हे खरे आहे.
(३) व (४) उक्त रस्ते नियमित देखभाल व दुरुस्तीसाठी जिल्हा परिषद पुणे यांचेकडे आहेत. तथापि, उक्त रस्त्यांच्या यादीतील ३ रस्त्यांचे कामांना रु. ४५९.८५ लक्ष इतक्या रकमेस प्राधिकरणाची प्रशासकीय मान्यता प्राप्त असून त्या कामांच्या निविदा प्रक्रीया प्रगतीपथावर आहे. प्राधिकरणामार्फत सद्य:स्थितीत मेट्रो प्रकल्प व माण, म्हाळुंगे नगर प्रकल्प, रिंग रोड, इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प इत्यादी प्रकल्प प्राधिकरणाच्या स्व उत्पन्नातून करण्याचे प्रस्तावित आहे. भविष्यात प्राधिकरणाकडे उपलब्ध निधीच्या नियोजनानुसार कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

---

## राज्यातील आणीबाणी विरोधकांचे आघाडी सरकारने बंद केलेले थकीत मानधन देण्याबाबत

**(३४) ५४४०२ (२४-०१-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आणीबाणी विरोधकांचे बंद केलेले थकीत मानधन देण्याची मागणी लोकतंत्र सेनानी संघाने माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात एकूण ३ हजार ४०८ आणीबाणी विरोधक सध्या हयात असून ते मानधनास पात्र आहेत. त्यापैकी ८०० जणांची यादी राज्यस्तरावर प्रलंबित आहेत. सदर पात्र असलेल्याना सुरुवातीपासून मानधन सुरू करावे, अशी मागणी लोकतंत्र सेनानी संघाने सरकारकडे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तसेच उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२३) :** (१) होय.
(२) व (३) दिनांक ३ जुलै, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये राबविलेल्या योजनेंतर्गत ३४५८ अर्जदारांना मानधन दिले आहे. सदर योजना सुधारित करण्याची कार्यवाही सुरु असताना अंदाजे ६५० अर्जदारांनी या योजनेंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज दाखल केले होते. कोविड विषाणूच्या पार्श्वभूमीवर सदर योजना दि.३१ जुलै, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये बंद करण्यात आली होती. आता, दिनांक २८ जुलै, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजना दिनांक १ ऑगस्ट, २०२२ पासून पुन्हा नव्याने सुरु केली आहे.
तथापि, मागील योजनेतील अंदाजे ६७८ प्रलंबित अर्जदारांना सुरुवातीपासून मानधन सुरु करावे अशी मागणी लोकतंत्र सेनानी संघाने केली आहे.
प्रस्तुत योजना बंद झाल्यामुळे प्रलंबित अर्जदारांनी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका दाखल केली होती. याप्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयानुसार त्यांना माहे ऑगस्ट, २०२२ पासून नियमित मानधन देण्यात येत आहे. तथापि, लोकतंत्र सेनानी संघाने केलेल्या मागणीनुसार प्रलंबित अर्जदारांना थकबाकी देण्याची बाब तपासण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्हयातील उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, येथे ट्रॅक्टर ट्रॉली पासिंग करण्यासाठी लाच मागितल्याबाबत

**(३५) ५४५४१ (२२-०१-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, येथे ट्रॅक्टर ट्रॉली पासिंग करून देण्यासाठी दहा हजार रुपयाची लाच मागितल्याचे प्रकरण माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे आयोजित शिबिरात ट्रॅक्टरची ट्रॉली पासिंग करून घेण्यासाठी शिवाजीनगर (ता.कडेगाव) येथील व्यक्तीला अधिकाऱ्यांसमवेत असलेल्या व्यक्तीने दहा हजार रुपयांची लाच मागितली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ट्रॅक्टर ट्रॉली पासिंग साठी श्री.प्रमोद मांडवे यांना दहा हजाराची लाच मागितल्याप्रकरणी शासनाने संबंधित आरटीओ व सोबतच्या दलाल व्यक्तिविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२४-०२-२०२३) :** (१) व (२) कडेगाव, जि. सांगली या शिबीराचे ठिकाणी श्री. प्रमोद मांडवे यांना लाच मागण्यात आली अशी चित्रफित समाजमाध्यमावर तसेच अशा आशयाची बातमी वृत्तपत्रामध्ये प्रसारीत झाली होती.
(३) प्राप्त अहवालाप्रमाणे श्री. मांडवे यांना श्री. रोहन सासणे, मोटार वाहन निरीक्षक यांनी स्वत: किंवा इतर कोणाहीमार्फत लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झालेले नाही. तथापि, श्री. मांडवे यांनी पोलीस स्टेशन, कडेगांव यांचेकडे नोंदविलेली

तक्रार कडेगांव पोलीस स्टेशनने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे पुढील कारवाईकरीता पाठविण्यात आली आहे.
(४) सदर प्रकरणी श्री. रोहन सासणे, मोवानि, सांगली यांनी गु.र.नं. ०२३०/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३५३, ५०४, ५०६ नुसार श्री. प्रमोद मांडवे यांचेविरुध्द पोलीस स्टेशन, कडेगांव येथे गुन्हा दाखल केला आहे.
(५) लागू नाही.

---

## नांदेड जिल्ह्यातील मुखेड, देगलूर व बिलोली या तीन तालुक्यांसह जिल्ह्यातील जलसंधारणाच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(३६) ५४५४७ (२२-०१-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील मुखेड, देगलूर व बिलोली तालुक्यात जलसंधारणाच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नांदेड जिल्ह्यातील इतर तालुक्यात देखील जलसंधारणाच्या कामामध्ये अनियमितता असतांना लाखोंची देयके कंत्राटदारांस अदा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यात जलसंधारणाची कामे, निविदा प्रक्रियेवर करण्यात आलेला खर्चाच्या तपशीलाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०२-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
नांदेड जिल्ह्यातील मुखेड, देगलूर व बिलोली या तालुक्यात जलसंधारण योजनांच्या दुरूस्तीच्या कामांमध्ये कोणताही गैरव्यवहार अथवा अनियमितता झालेली नाही. नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील १०३ योजनांना शासनाकडून मा. मुख्यमंत्री जलसंवर्धन कार्यक्रमांतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर १०३ योजनांचे कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. त्यामधील दापका गुंडोपंत को.प.बं. व हरणमाळ पा. त. ही मुखेड तालुक्यातील २ कामे पूर्ण झाली आहेत. तसेच २६ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली असून सदर २६ योजनांवर निधी अभावी खर्च झालेला नाही व ७५ कामे प्रगतीपथावर असून सदर कामे निविदेतील अटी व शर्तीनूसार पूर्ण करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बिलोली व देगलूर (जि.नांदेड) तालुक्यातील पुनर्वसित गावात नागरी सुविधा पुरविण्यासाठी निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(३७) ५४५४९ (२१-०१-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बिलोली व देगलूर (जि.नांदेड) तालुक्यातील पुनर्वसित गावांमध्ये सिमेंट काँक्रीट रस्ता, नाली, विद्युतीकरण, सभागृह इत्यादी विकास कामांचे अंदाजपत्रक सादर करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास जिल्हाधिकारी, नांदेड यांनी माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आदेशित करूनही विभागाने अंदाजपत्रक सादर केलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुद्धा देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघातील उक्त दोन्ही तालुक्यातील पुनर्वसित गावांची यादी देऊन या गावांना सिमेंट काँक्रीट रस्ता, नाली, विद्युतीकरण, सभागृह इत्यादी विकास कामांचे अंदाजपत्रक मागविण्याबाबतचे निवेदन शासनास दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय व तदनुषंगाने विकास कामांचे अंदाजपत्रक सादर न करणाऱ्या संबंधित अधिकारी यांचे विरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२३) :** (१) अशंत: खरे आहे.

मौजे अटकळी ता. बिलोली येथील नागरी सुविधेचे अंदाज पत्रक शासनास दि.२०.०१.२०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केले असून तपासणीअंती शासनास मान्यतेसाठी पाठविण्यात येईल.

(२) हे खरे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भुसावळ नगरपालिकेतील विविध गैरव्यवहारासंबंधी शासनाने नेमलेल्या समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने कारवाई करण्याबाबत**

**(३८) ५४६५६ (२७-०१-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगाव) शहरात सिटी सर्व्हे क्रमांक ३५६, २५७ व २२० वर अनधिकृत बांधकाम केल्यामुळे सदरहू अतिक्रमण निष्काषित करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, नगरविकास विभाग व नगरपालिका प्रशासन, जळगांव यांच्याकडे तक्रार केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपालिकेतील विविध गैरव्यवहारासंबंधी शासनाकडे करण्यात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने व जिल्हा प्रशासनाने दिनांक २३ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी समिती नेमल्यानंतर आठ महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यावरही समितीने अहवाल सादर करण्यास दिरंगाई करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत अहवालात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२३) :** (१) सदर प्रकरणी तत्कालीन विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांची दि.०४.०३.२०२२ रोजीची तक्रार भुसावळ नगरपरिषदेस प्राप्त झाली आहे.

(२) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दि.२३.०३.२०२२ रोजी जिल्हा प्रशासन अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन केल्याची बाब खरी आहे.

(३) व (४) सदर समितीने दि.२४.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये समितीचे काम अंतिम टप्प्यात असल्याबाबत कळविले असून, चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील मौजे कमारे लघु पाटबंधारे योजनेंतर्गत प्रकल्पात बाधित होणाऱ्या आदिवासींना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३९) ५४७७७ (२२-०१-२०२३). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील लघु पाटबंधारे योजनेअंतर्गत मौजे कमारे येथील बंधाऱ्याचे ९०% काम पूर्ण झालेले असताना उर्वरित बाधित आदिवासींना पर्यायी जागा उपलब्ध न करुन दिल्याने प्रकल्पाचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकल्पात बाधित होणाऱ्या आदिवासींना पर्यायी जागा उपलब्ध करणेबाबत तसेच प्रलंबित काम पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-०३-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) लघुपाटबंधारे योजना कमारे या प्रकल्पाचे घळभरणी व्यतिरिक्त काम पूर्ण झालेले आहे. धरणाच्या बुडीत क्षेत्रात वनपट्टे येत असल्याने सदर आदिवासी वनपट्टेधारकांना मौजे टोकराळे येथील स. नं. ३३ क्षेत्र २०.९३.०० हे. आर जमीन उपलब्ध करुन देण्यासंदर्भात महसूल व वन विभागाकडून पुढ़ील कार्यवाही करण्यात येत आहे. वनपट्टेधारकांना पर्यायी जमीन उपलब्ध झाल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्पाचे उर्वरित काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हुतात्मा स्मारकांच्या दुरुस्तीसह परिसरात अभ्यासिका सुरु करण्याबाबत

**(४०) ५४८२२ (२५-०१-२०२३). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा मुक्तिसंग्रामचे अमृत महोत्सवी वर्ष असल्याने राज्याने विभागातील ५५ हुतात्मा स्मारकांच्या दुरुस्तीसह परिसरात अभ्यासिका सुरु करण्याचा निर्णय तत्कालिन शासनाने घेऊन ७५ कोटीचा निधी मंजूर करुनही अद्यापही सदरहू प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहु प्रस्ताव मान्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२३) :** (१) तत्कालिन शासनाने मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करणेबाबत केलेल्या घोषणेच्या अनुषंगाने अमृत महोत्सवी वर्षामध्ये आयोजित करावयाच्या कार्यक्रमांची रुपरेषा निश्चित करण्यासाठी दि.०४.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली होती.

सदर मंत्रिमंडळ उपसमितीने मंजूरी दिलेल्या कार्यक्रम आराखडा व खर्च आराखडा यास मान्यता देण्याची कार्यवाही सुरु होती. तथापि, दरम्यानच्या कालावधीत नवीन मंत्रिमंडळ स्थापन झाल्यामुळे दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवीन मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यात आली आहे.

सदर मंत्रिमंडळ उपसमितीने सुधारित कार्यक्रम आराखड्यास मंजूरी दिली आहे. सदर कार्यक्रम आराखडा व खर्च आराखडा विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडून शासनास प्राप्त झाला आहे.

(२) नवीन मंत्रिमंडळ उपसमितीने मंजूरी दिलेल्या कार्यक्रम आराखडा व खर्च आराखड्याच्या मंजूरीबाबत नियोजन विभाग व वित्त विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असून, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या अभिप्रायानुसार कार्यक्रम आराखडा व खर्च आराखडा यास शासन मान्यता देण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील माहुल गाव व चेंबूर परिसरात वाढत असलेल्या हवेतील प्रदूषण वाढल्याबाबत

**(४१) ५४९४१ (२६-१२-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील माहुल गावातील सिलोर्ड कंटेनर्स प्रा.लि. या कंपनीमध्ये घातक विषारी रसायने भरताना हवेत मिसळत असल्याने तेथे मोठ्या प्रमाणात वायुप्रदूषण होत असल्याने रहिवाश्यांना दमा, अस्थमा सारखे श्वसनासंबंधित गंभीर आजार होत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील दोन महिन्यांपासून अत्यावश्यक सेवेच्या नावाखाली सदर कंपनीने ३०० पेक्षा अधिक विषारी वायूचे टॅंकर रोज भरीत असल्याने सतत विषारी वायूची गळती होत असल्याने अनेक कामगारांना कोरोना व इतर आजाराची लागण झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच उक्त कंपनीच्या विरोधात गावकऱ्यांनी मा राष्ट्रीय हरित लवादाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे

आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सिलोर्ड कंटेनर्स प्रा.लि. या कंपनीवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) सदर प्रश्न औद्योगीक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांच्याकडून दिनांक २७.१२.२०२२ रोजी प्राप्त अहवालानुसार मे. सिलोर्ड कंटेनर्स प्रा. लि. या कारखान्यामध्ये रसायने भरताना माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये व त्यादरम्यान कोणतीही घटना घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) हे खरे आहे.
श्री.चारुदत्त कोळी व इतर यांनी प्रश्नाधीन कंपनीच्या विरोधात मा. राष्ट्रीय हरीत लवादासमोर मूळ अर्ज क्र.४०/२०१४ दाखल केला होता. सदर अर्ज मा. राष्ट्रीय हरीत लवादाने दिनांक १८/१२/२०१५ रोजीच्या आदेशानुसार निकाली काढला आहे. तद्नंतर श्री. चारुदत्त कोळी यांनी मा.राष्ट्रीय हरीत लवादासमोर अंमलबजावणी अर्ज क्र.५/२०१८ दाखल केला होता. सदर अर्ज दिनांक १३/८/२०२० रोजीच्या आदेशानुसार निकाली काढण्यात आला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २७/१०/२०२० रोजीच्या आदेशानुसार मा. राष्ट्रीय हरीत लवादाच्या दिनांक १३/८/२०२० रोजीच्या आदेशास स्थगिती दिली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) मा. राष्ट्रीय हरित लवाद यांच्या दि. १५.०७.२०१९ च्या आदेशानुसार, सदर कारखान्यातुन होणाऱ्या VOC उर्त्सर्जनाचे प्रमाण कमी करण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत (Action Plan) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगास दि. ०१.०८.२०१९ रोजी निर्देश देण्यात आले होते. या निर्देशांची पूर्तता उद्योगामार्फत करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) नगरपरिषदेमधील सर्व्हे क्र.३५८ व ३५९ मधील नगरपरिषद आरक्षण (क्र.७८ A) च्या स्थानांतरणाबाबत

**(४२) ५५०१० (१८-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील श्री.शेख रहीम शेख रज्जाक व इतर ६ सर्व नगरपरिषद सदस्य यांनी मौजे अंबाजोगाई येथील जमीन सर्व्हे.क्र.३५८ व ३५९ मधील नगरपरिषद आरक्षण (क्र.७८ A) चे स्थानांतरणाबाबत तत्कालीन नगराध्यक्ष, नगरसेवक व मुख्याधिकारी तसेच नगररचनाकार, नगरपरिषद अंबाजोगाई यांनी संगनमत करुन सदर जमीनी संदर्भात बेकायदेशीर बनावट ठराव तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी त्यांनी पदाचा दुरूपयोग करुन सदरहू बनावट ठरावाला तात्काळ स्थगिती देवून दोषींवर कायदेशीर कारवाई करणेबाबत दिनांक ३० नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास श्री.राहुल रेखावर, तत्कालीन जिल्हाधिकारी, बीड यांचाकडे अर्ज केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने तत्कालीन जिल्हाधिकारी, बीड यांनी सदर प्रकरणी अर्जदार यांची तक्रार व सर्व कागदपत्रे पाहता गंभीर आक्षेप घेत सदरील सर्व रेखांकने तात्काळ रद्द करून संरक्षक भिंतीवर अनधिकृत बांधकाम पाडण्याची कारवाई करून श्री. फुंद यांनी श्री. सुरेश मोदी यांच्याकडून घेतलेल्या ३६५९ मी. जागेवर अनधिकृत बांधकाम सिडेन्शियल तसेच कमर्शिअल केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील अनधिकृत बांधकाम पाडण्याची कारवाई मुख्याधिकारी, नगर परिषद अंबाजोगाई यांनी तात्काळ करावी, या सह विविध मुद्यावर गंभीर आक्षेप घेत कार्यवाही करण्याबाबत आदेशित केल्यानंतर, आदेशा नंतर सध्याचे श्री.राधाबिनोद शर्मा, जिल्हाधिकारी, बीड यांनी सदर प्रकरणी परत फेर सुनावणी घेऊन उक्त निर्णयातील बरेच मुद्दे विचारात न घेता निकाल दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने आताच्या जिल्हाधिकारी यांनी फेरनिर्णय दिल्यामुळे याबाबत त्वरीत चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास

मंत्री यांच्याकडे दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.

अंबाजोगाई नगरपरिषद सर्वसाधारण सभा ठराव क्र.१४८, दि.३०.११.२०१८ च्या इतिवृत्तास दि.०६.०७.२०१९ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये बहुमताने मान्यता दिली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.

तत्कालीन जिल्हाधिकारी, बीड यांनी रेखांकन रद्द करण्याबाबतचे व अनधिकृत भिंतीवर कारवाई करण्याचे आदेश दिल्याची बाब खरी आहे. श्री. फुंदे यांनी अनधिकृत बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे.
(४) सदर प्रकरणी अर्जदार श्री.शेख रहीम शेख रज्जाक व इतर, नगरपरिषद सदस्य, अंबाजोगाई नगरपरिषद यांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्र.९८२/२०२१ आणि क्र. २१९३/२०२१ मध्ये मा.न्यायालयाने दि.२३ जून, २०२१ रोजी सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, बीड यांनी फेरसुनावणी घेऊन आदेश पारित करण्याबाबत निदेश दिले. त्यानुसार सदर प्रकरणी संबंधितांना नोटीस देवून फेरसुनावणी घेऊन, दि.०२ सप्टेंबर, २०२२ रोजी आदेश पारित केले आहेत.
(५) हे खरे आहे.
(६) जिल्हाधिकारी, बीड यांच्या दि.०२ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या आदेशाविरुद्ध श्री.सुरेश प्रकाश मोदी यांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र.१०७९७/२०२२ दाखल केली असून, प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

## राज्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गत येणाऱ्या अनुदानित वसतिगृहातील अधिक्षक व कर्मचारी यांना वेतनश्रेणी मिळण्याबाबत

**(४३) ५५०८३ (२५-०१-२०२३). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गत येणाऱ्या १०० टक्के अनुदानित वसतिगृह अधिक्षक व कर्मचारी यांना वेतन श्रेणी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ ऑक्टोंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे, असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०३-२०२३) :** (१) होय.
(२) सामाजिक न्याय विभाग,शासन निर्णय, दिनांक १६.३.१९९८ अन्वये विहीत केलेल्या नियमावलीनुसार स्वयंसेवी संस्था संचलित वसतिगृह कर्मचाऱ्यांना मानधन देय असून त्यांना वेतनश्रेणी अनुज्ञेय नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सीएनजीच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने रिक्षा-टॅक्सी वाहतुकदारांना ४० टक्के अनुदानित दरात सीएनजी उपलब्ध करण्याबाबत

**(४४) ५५१४८ (२२-०१-२०२३). श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सीएनजीच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने रिक्षा-टँक्सी वाहतुकदारांनी ४० टक्के अनुदानित दरात सीएनजी उपलब्ध करण्याबाबत माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सरकारने खटुआ समितीच्या अहवालावर आधारित भाडेवाढ द्यावी त्यापुर्वी सरकारने अनुदानित दरात गँस उपलब्ध करण्याची मागणी मुंबई आँटो-रिक्षा संघटनेनी केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२३) :**(१) व (२) होय.
(३) मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या दि.२६.०९.२०२२ रोजीच्या बैठकीतील निर्णय क्र.०२/२०२२ अन्वये ऑटोरिक्षा टॅक्सी भाडेदरात वाढ करण्यात आली आहे.
मा.मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली परिवहन विभागाचे अधिकारी तसेच ऑटोरिक्षा/टॅक्सी संघटनेचे पदाधिकारी यांचेसमवेत दि.२३.०९.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत सीएनजी दरामध्ये सबसिडी मिळण्याबाबतच्या मागणी संदर्भात बाब ही महानगर गॅस लि. या संस्थेशी संबंधित असल्याने याबाबत राज्य शासन स्तरावर निर्णय होणे शक्य नाही असे स्पष्ट करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली नगरपरिषदेने केलेल्या कर रचनेला तात्काळ रद्द करून नवीन कररचना करणेबाबत**

**(४५) ५५२९९ (२६-१२-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली नगरपरिषदेने सन २०२२-२३ मध्ये शहरातील नागरिकांना नवीन घर कर आकारणीची नोटीस बजावली असून या नोटीसमध्ये प्रचंड प्रमाणामध्ये विविध प्रकारचे कर लावून लोकांना अवाजवी कर भरण्यास दिनांक १७ नोव्हेंबर, २०२२ रोजी कळविले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या सुधारित कर मूल्य निर्धारणाचे विवरण करताना नगरपरिषदेने महाराष्ट्र शासनाचा शिक्षण कर, रोजगार हमी उपकर, वृक्ष कर, अग्निशमन कर, अन्य शिक्षण कर, दिवाबत्ती कर, उपयोगिता शुल्क कर असे विविध प्रकारचे जाचक व जुलमी कर शहरवासीयांवर लादलेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गडचिरोली या जिल्ह्यातील लोकसंख्या १ लाखांपेक्षा कमी असून, येथे सर्वसामान्य व गरीब लोकांची संख्या सर्वाधिक असून, या शहरातील लोकांना नगरपरिषदेने आकारलेले नवीन कर देणे परवडणारे नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नगरपरिषदेने आकारलेले नवीन कर तात्काळ रद्द करुन सर्वसामान्य लोकांना परवडेल अशा दरात कर रचना करण्यात यावी, याकरिता स्थानिक लोकांनी प्रशासनाकडे निवेदने दिलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने तातडीने निर्णय घेऊन गडचिरोली नगर परिषदेच्या कर रचनेला रद्द करून नवीन कर रचना करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
गडचिरोली नगरपरिषदेने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम-१२४(२) नुसार सर्व मालमत्तांच्या करपात्र मुल्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी चतुर्थ वार्षिक कर मुल्यांकन प्रक्रिया सुरु केली असून यासाठी मालमत्तांच्या कर आकारणीबाबत दिनांक १७/११/२०२२ रोजीच्या नोटीस अन्वये नागरिकांच्या हरकती मागविल्या आहेत. त्यामध्ये कर भरण्याबाबत नागरिकांना नोटीस देण्यात आलेल्या नाहीत.
(२) हे खरे नाही.

गडचिरोली नगरपरिषदेने सन २०२३-२०२४ ते २०२६-२०२७ साठी चतुर्थ वार्षिक कर मुल्यांकन निर्धारण करताना शासनाने ठरवून दिलेल्या तसेच अधिनियमातील तरतूदीनुसार / निकषानुसार शिक्षण कर, रोजगार हमी कर, वृक्ष कर, अग्निशमन कर, विशेष शिक्षण कर, उपभोक्ता शुल्क, इत्यादी कर निर्धारण करण्याचा निर्णय घेतल्याचे दिसून येत आहे.
(३) गडचिरोली शहराची सन २०११ च्या जनगणनेनुसार ५४१५२ इतकी लोकसंख्या असून शहरामध्ये दारिद्र्य रेषेखालील एकूण २३०० कुटुंब आहेत.

गडचिरोली नगरपरिषदेने मालमत्ता करमुल्य निर्धारण करण्याकरीता दरपत्रक प्रस्ताव प्राधिकृत मुल्यांकन अधिकारी, गडचिरोली यांच्याकडे सादर केला होता. त्यामध्ये निवासी इमारतीकरीता बांधकामाच्या प्रकारानुसार मुल्यांकन अधिकारी यांनी उच्च वस्ती, मध्यम वस्ती, कनिष्ठ वस्ती यांचेकरीता मालमत्ताकरासाठी दर निश्चित करुन दिले आहेत.

नगरपरिषदेच्या हद्दीतील मालमत्ता करांचे जुने दर व नव्याने प्रस्तावित करण्यात आलेले दर यांची तुलना केली असता जुन्या दरापेक्षा सुधारित प्रस्तावित दर मुल्य निर्धारण अधिकारी यांनी कमी केल्याचे दिसून येते.
(४) होय, हे खरे आहे.
(५) नगरपरिषदेच्या हद्दीतील करनिर्धारण हे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या तरतूदीनुसार करण्यात येणारी प्रक्रिया असून यामध्ये कलम-१२० नुसार नगरपरिषदेच्या कर निर्धारणाबाबत प्राप्त झालेल्या आक्षेपावर प्राधिकृत कर मुल्य निर्धारण अधिकारी यांनी संबंधीतांना आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर चौकशी करुन कार्यवाही करण्याची तरतूद आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## मौजे आवरमारा (ता.कुही, जि.भंडारा) या गावाचे पुनर्वसन विशेष बाब म्हणुन करण्याबाबत

**(४६) ५५३५२ (२७-०१-२०२३). श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यातील गोसेखुर्द धरण १०० टक्के भरल्यामुळे पाण्याची पातळी वाढून आवरमारा गाव तिन्ही बाजूने पाण्याने वेढला जात असून सदर गावाला बेटाचे स्वरूप तयार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात घरांचे नुकसान होत असून, आवरमारा या गावालगत असलेली नळयोजना ही संपुर्ण पाण्यात बुडून जात असल्यामुळे गावातील नागरिकांना दुषित पाणी प्यावे लागत असल्याने त्यांच्या आरोग्यास देखील धोका निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच सदर गावामध्ये तिन्ही बाजूने पाणी भरत असल्यामुळे पाण्यामध्ये मगर, विषारी साप व इतर जिव जंतू यांचा वावर असल्याने बऱ्याच नागरिकांचा यामुळे मृत्यु झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार आवरमारा गावाचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२३) : (१)** अशंत: खरे आहे

मौजा-आवरमारा ता. कुही जि. नागपुर या गावाचे सभोवताल तीन्ही बाजुने प्रकल्पाचे पुर्ण संचय पातळी २४५.५० मी. ला पाणी साचते.
(२) प्रकल्पात १०० टक्के पाणीसाठा केल्याने मोठयाप्रमाणात घरांचे नुकसान झाल्याचे आढळुन आलेले नाही. तसेच नळ योजना ही काही प्रमाणात पाण्यात बुडून जात आहे.

परंतु पाणी नमुना तपासणी अहवालानुसार पाणी नमुने दुषित आलेले नाही. लोकांना दुषित पाणी मिळणार नाही याबाबत काळजी घेण्यात येते. नियमित क्लोरीकेशन करण्यात येते. दर ३ महिन्यानी सदर नळ योजनेचे पाणी रासायनिक व जैविक नमुने तपासणी करण्यात येते.
(३) अंशत: खरे आहे.

मौजा-आवरमारा गावात तिन्ही बाजुने प्रकल्पाचा पाण्याचा वेढा असल्याने गावात सरपटणारे प्राण्यांचे प्रमाण वाढलेले आहे, परंतू मगर मात्र आढळुन आलेले नाही. तसेच यामुळे गावात अद्यापपर्यंत जीवीतहानी झालेकी नाही.
सदर गावाला दिलेल्या भेटी दरम्यान खबरदारी म्हणुन संबधीत अधिकऱ्यांना याबाबत आवश्यक उपाययोजना करण्यास

निर्देशित करण्यात आलेले आहे.
(४) आवरमारा गाव हे प्रकल्पाने बाधित होत नसल्याने दि.१४.१०.२०२२ शासन निर्णयातील तरतूदीनुसार पूरामुळे बाधित गांवाचा पुनर्वसनाचा प्रस्ताव सादर करण्याविषयी निर्देशित करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नियमबाह्यपणे दुपटीहून अधिक तिकीटांचे दर आकारणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्यांबाबत

**(४७) ५५५३६ (२२-०१-२०२३). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन महामंडळाच्या एसटीच्या तिकीटाच्या तुलनेत खाजगी ट्रॅव्हल्सच्या तिकीटाचा दर शासकीय नियमानुसार दीडपट आकारण्याची तरतुद असतानाही खाजगी ट्रॅव्हल्स दुपटीहून अधिक तिकीट दर आकारला जात असल्यामुळे हिंदू जनजागृती समितीच्या सुराज्य अभियानाव्दारे दिनांक १८ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास परिवहन आयुक्तांकडे तक्रार करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोटार वाहन विभागाच्या संकेतस्थळावर सन २०२२ मधील कारवाईच्या आकडेवारीमध्ये नियमबाहय अधिक तिकिटदर आकारणाऱ्या ट्रॅव्हल्सवाल्यांवर केलेल्या कारवाईचे प्रमाण नगण्य आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाजगी ट्रॅव्हल्सच्या बुकींग सेंटरवर योग्य तिकिट दराचे पत्रक लावण्याची सूचना परिवहन आयुक्तांनी दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, मोटार वाहन विभागाच्या संकेतस्थळावर प्रवाशांना तक्रार करण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक नसून असलेली संकेतस्थळाची लिंक तसेच मोबाईल ॲप मागील काही महिन्यांपासून नादुरुस्त असल्याची तक्रार सुराज्य अभियानाकडून करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(५) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०२-२०२३) :** (१) होय.
(२) राज्यातील सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाद्वारे प्रवाशांकडून मनमानी भाडे आकारणाऱ्या वाहनांची तपासणी करून एकूण ३०३ दोषी वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे.
(३) राज्यातील सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांना परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दि.२५.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत.
(४) व (५) तक्रार निवारण प्रणाली तसेच मोबाईल ॲप काही कालावधी पासून नादुरुस्त असून दुरुस्तीचे काम सुरु आहे. तथापि, मोटार वाहन विभागाच्या संकेत स्थळावर तक्रार करण्याकरिता टोल फ्री क्रमांक १८००१२०८०४० प्रदर्शित करण्यात आलेला आहे.

---

### मौजे सोनबर्डी (ता.एरंडोल, जि. जळगांव) येथील पुनर्वसनाला शासनाने तत्वतः मंजूरी दिल्याबाबत

**(४८) ५५५५७ (२७-०१-२०२३). श्री.चिमणराव पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सोनबर्डी (ता.एरंडोल, जि.जळगांव) येथील पुनर्वसनाला शासनाने तत्वतः मंजूरी दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मंजूरीनुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदरहू पुनर्वसनाची कार्यवाही किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०३-२०२३) :** (१) होय, खरे आहे.

(२) व (३) दि.१४/१०/२०२२ च्या शासन निर्णयामधील तदतुदीनूसार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगाव यांच्या दि.१७/११/२०२२ च्या आदेशान्वये संबंधित यंत्रणेची पुनर्वसनाची प्रक्रिया पुर्ण करण्याची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगाव यांचेकडून सोनबर्डी पुनर्वसनाचा आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंठा ( जि.जालना) तालुक्यातील पुर्णा नदीवरील पूलाचे काम अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(४९) ५६४५७ (२५-०१-२०२३). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंठा (जि. जालना) तालुक्यातील पुर्णा नदीवरील पूलाचे काम अपुर्णावस्थेत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, पुर्णा नदीजवळील पोच मार्गासाठी लागणारी जमीन संपादित करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेगाव-पंढरपूर पालखी महामार्गावरील जमीन संपादन करुन पुलाचे काम पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

माहे नोव्हेंबर २०२२ पर्यंत व अद्यापही काम अपूर्ण अवस्थेत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) जमीन संपादनाची कार्यवाही झालेली असुन, ती अंतिम टप्यात आहे.

(४) भूंसपादनाचे निवाडे केंद्रिय सडक परिवहन मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक २५.०१.२०२३ अन्वये मंजूर केले आहेत.

---

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आणीबाणीच्या काळयात तुरुंगवास भोगणाऱ्यांना मानधन मिळण्याबाबत

**(५०) ५९३६५ (२२-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आणीबाणीच्या काळात सत्याग्रही व मिसाबंदी होते त्यांना सन २०१८ मध्ये राज्य शासनाने मानधन देण्याची योजना सुरु केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ५४ जणांपैकी केवळ ३४ जणांना या योजनेचा लाभ मिळत असून उर्वरीत २० जणांना अद्यापही या योजनेचा लाभ मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आणीबाणीच्या काळयात तुरुंगवास भोगणाऱ्या उर्वरीत २० जणांना अनुदान तात्काळ न मिळाल्यास त्यांच्याकडून दिनांक २६ जानेवारी, २०२३ रोजी पासून उपोषण करण्याचा इशारा शासनास देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उपरोक्त २० जणांना मानधन मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०५-२०२३) :** (१) होय.

(२) सिंधुदुर्ग जिल्हयातील आणीबाणी योजनेतील ५४ लाभार्थीपैकी ३४ जणांना माहे जानेवारी, २०१८ पासून मानधन अदा केले आहे. उर्वरित २० जणांना शासन निर्णय दिनांक ५.०१.२०२३ अन्वये, माहे ऑगस्ट, २०२२ पासून मानधन

वितरीत करण्यात आले असून सद्यस्थितीत सिंधुदुर्ग जिल्हयातील एकूण ५४ लाभार्थींना माहे ऑगस्ट, २०२२ ते मार्च, २०२३ पर्यंतचे नियमित मानधन अदा करण्यात आले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.